BMCS, College of Social Work, Chopda
IQAC

||संस्कृती रक्षति: स्त्री शक्ति:||

भगिनी मंडळ चोपडा संचलित

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव

भगिनी मंडळ,
चोपडा, जि. जळगांव

**स्थापना वर्ष-१९९४**

*विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास योजना*
*अंतर्गत कार्यशाळा*

# युवती सभा कार्यक्रम /अहवाल

**दिनांक-२५ जानेवारी २०१७**

प्रा.संबोधी एम.देशपांडे, (युवती सभा प्रमुख)

Sundhargadhi, Chunchale Road,
Tal-Chopda, Dist-Jalgaon
**Phone No.02586-223017**

महाराष्ट्र शासन अनुदानित व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव संलग्नीत
भगिनी मंडळ चोपडा संचलित,

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा जि.जळगांव

महाराष्ट्र शासन मान्यता पत्र क्र. CSW.1094/12355/F.N.107/Sudhar,1 Dt.30/6/1994
विद्यापीठ मान्यता पत्र क्र. NMU/94/5/J-48/6152 Date:-13/9/1994

Dr.Ishwar M. Saundankar
Principal
Phone No.02586-223017
Fax No. 02586-223017, 220533

'B' Grade NAAC Accredited (2.66)

Mrs.Poonam Ashish Gujarathi
President
Post Box No.20, Chopda
Phone No.02586-220015

जा.क्रं.- ममसकाम/ 386/2016-17

दिनांक - 22-02-2017

प्रति,
मा.संचालक सो.
विद्यार्थी कल्याण विभाग
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

विषयः-युवती सभेचा-२०१६-१७ अहवाल व हिशेब पत्रक स्विकारणेबाब..

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंती की, भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव येथे युवती सभा अंतर्गत विद्यार्थीनींची कार्यशाळा दि.२५ जानेवारी, २०१७ या दिवशी संपन्न झाली. सदर युवती सभेचा अहवाल कार्यक्रमाचे फोटोसह पाठवित आहोत. तसेच कार्यक्रमाचे खर्चाचे हिशोब पत्र पाठवित आहोत.

कृपया स्विकार व्हावा ही विनंती.

स्नेहादराने,

आपला विश्वासू,

(डॉ.ईश्वर मा.सौंदाणकर)
प्राचार्य,
भगिनी मंडळ चोपडा संचलित,
समाजकार्य महाविद्यालय चोपडा,
जि.जळगांव

सोबतः- १) अहवाल
२) खर्चाचे व्हावचर्स

BMC's, College of Social Work, Chopda
IQAC

# युवती सभा अंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजने अंतर्गत कार्यशाळेचा अहवाल

## दि. २५ जानेवारी, २०१७

भगिनी मंडळ चोपडा संचलित  समाजकार्य महाविद्यालयामध्ये युवती सभे अंतर्गत व्यक्तिमत्व विकासासाठी दि.25 जानेवारी, 2017 रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेमधून महाविद्यालयातील  युवतींना विविध विषयांवरील ज्ञान मिळावे आणि या ज्ञानाचा उपयोग त्यांनी प्रत्यक्ष जीवनात कायम स्वतःचा सर्वांगिण विकास करावा हा या कार्यशाळेचा हेतू होता.  या कार्यशाळेमध्ये महात्मा गांधी संचलित कला,शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, पंकज महाविद्यालय, नर्सिंग स्कुल ऑफ चोपडा, फार्मसी महाविद्यालय चोपडा, बी.एड.महाविद्यालय चोपडा आणि समाजकार्य महाविद्यालयातील एकूण 90 विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या.

युवती सभेअंतर्गत व्यक्तीमत्व विकास कार्यशाळेचे उद्घाटन भगिनी मंडळाच्या अध्यक्षा मा. सौ.पुनमताई गुजराथी संस्थेच्या सहसचिव सौ.अश्विनीताई गुजराथी, प्रा.आशा वाघजाळे (इलेक्ट्रॉनीक विभाग, चोपडा) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, प्रा.आशिष गुजराथी, डॉ.मारोती गायकवाड (विद्यार्थी कल्याण अधिकारी) प्रा.संबोधी देशपांडे (युवती सभा प्रमुख) यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम राष्ट्रमाता सावित्रिबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



**युवती सभा कार्यशाळेचे उद्घाटन करीत असतांना सौ.पुनमताई गुजराथी व अश्विनीताई गुजराथी**

College of Social Work, Chopda
IQAC




**कार्यक्रमाचे प्रास्ताविक करीत असतांना प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर**

यानंतर विद्यार्थीनींनी स्वागत गीत व ईशस्तवन सादर केले. सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ ईश्वर सौंदाणकर यांनी केले.
याप्रसंगी त्यांनी या कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. युवतींनी आपल्या जीवनामध्ये अधिक सक्षम करण्यासाठी व विविध विषयांवरील ज्ञान घेण्याकरीता सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये युवतींचे संरक्षण- आजच्या काळाची गरज, स्त्री-पुरुष समानता, युवतींचा व्यक्तीमत्व विकास आणि युवतींचे आरोग्य या सर्व विषयावर युवतींनी चर्चा करुन या चर्चेचा उपयोग आपल्या प्रत्यक्ष जीवनामध्ये करावा अशी अपेक्षा त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

यानंतर कार्यशाळेच्या प्रमुख उद्‌घाटक मा.अश्विनीताई गुजराथी (सहचविव, भगिनी मंडळ चोपडा) यांचा परिचय कु.सपना चौधरी या विद्यार्थीनीने करुन दिला. तसेच उद्‌घाटन प्रमुख व प्रमुख पाहण्याचे स्वागत पा.संबोधी देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा.पुनमताई गुजराथी (अध्यक्षा,भगिनी मंडळ चोपडा) यांचे स्वागत प्रा.डॉ.मारोती गायकवाड (विद्यार्थी कल्याण अधिकारी) यांनी केले. तसेच प्रा.आशा वाघजाळे यांचे स्वागत प्रा.मोहिनी उपासनी यांच्या हस्ते करसयात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर व प्रा. आशिष गुजराथी यांचे स्वागत प्रा.डॉ.मारोती गायकवाड यांनी केले.

यांनतर आजच्या कार्यशाळेच्या उद्‌घाटक मा.अश्विनीताई गुजराथी यांनी आपल्या व्याख्यानातून

MC's, College of Social Work, Chopda
IQAC

युवतींना आपण जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वयंनिर्भर होणे आवश्यक आहे. तसेच अधिक ज्ञान, वाचन, चिंतन, मनन यातून आपला व्यक्तीमत्व विकास होण्यास अधिक फायदा मिळेल. तसेच आजच्या व्याख्यानाची शिदोरी आपणास पुढे भविष्यात निश्चितच फायदेशीर ठरेल असा कानमंत्र त्यांनी आपल्या व्याख्यानातून दिला. तसेच सतत प्रयत्न व अभ्यासुवृत्ती या दोन्हींचा वापर केल्यास आपण जीवनात निश्चीत यशस्वी होणार अशी आशा त्यांनी व्याख्यानातून व्यक्त केली.




**युवती सभा कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करीत असतांना**
**मा.सौ.अश्विनीताई गुजराथी**

यानंतर आजच्या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमातील अध्यक्षीय भाषणामध्ये भगिनी मंडळ संस्थेच्या अध्यक्षा मा. पुनमताई गुजराथी यांनी सदर कार्यशाळा ही विद्यार्थीनींच्या व्यक्तीमत्व विकासाला वाव देशारी आहे. युवतींच्या सरक्षण, स्त्री पुरुष समानता, व्यक्तीमत्व विकास, युवतींचे आरोग्य या विषयावर विचारांची देवाण- घेवाण करण्यासाठी खुले व्यासपीठ विद्यार्थीनींना उपलब्ध करुन दिले आहे. युवतींना सक्षक होण्यासाठी 3-M ची गरज आहे. 1) M-Money 2) M-Movement 3) M-Muscles यामुळे तुमचा आत्मविश्वास अधिक वृद्धिंगत करण्यासाठी निश्चितच उपयोगी ठरेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यांनतर उद्घाटन कार्यक्रमाचे आभार विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा.डॉ.मारोती गायकवाड यांनी मानले.

College of Social Work, Chopda
IQAC




युवती सभा कार्यशाळेचे उदघाटन प्रसंगी अध्यक्षीय भाषण करीत असतांना
मा.पुनमताई गुजराथी




युवती सभा कार्यशाळेच्या उदघाटनाचे आभार मानतांना प्रा.डॉ.मारोती गायकवाड

College of Social Work, Chopda
IQAC

यानंतर प्रा.आशा वागजाळे यांनी युवतींचे स्व-संरक्षण आजच्या काळाची गरज या विषयावर युवतींना मार्गदर्शन केले. स्त्री जन्माला आल्यापासून ते सासरी जाईपर्यंत तीचे पालनपोषण आई-वडील खुप आपुरकीने व काळजीने करीत असतात. मात्र आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे युवतींचे संरक्षण हा विषय अत्यंत महत्वाचा ठरत आहे. त्यामुध्ये आपल्या कुटूंबाची, आपण जिथे शिक्षण घेत आहोत ते कॉलेज आणि शासनाची ही भूमिका कशी महत्वाची आहे हे त्यांनी उदाहरणे देवून विद्यार्थीनींना समजावून सांगितले. तसेच शासनाने मोबाईलवरही निर्भया हेल्पलाईन व ॲप सुरु केले अस्त्याचे त्यांनी विद्यार्थीनींना सांगितले. तसेच आपण स्वतःही निर्भय होवून आपल्या जीवनात येणाऱ्या संकटांना सामोरे गेले पाहिजे आणि त्यातून आपला आत्मविश्वासही वाढवला पाहिजे असे आवाहन त्यांनी उपस्थितींना केले.




**युवती सभा कार्यशाळेमध्ये विद्यार्थीनींना मार्गदर्शन करीत असतांना प्रा.आशा वाघजाळे**

यानंतर स्त्री-पुरुष समानता या विषयावर मार्गदर्शन करतांना **मा.प्रा.भरत खंडागळे, समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर** यांनी पॉवर पॉईन्ट प्रेझेन्टेशनच्या माध्यमातून विद्यार्थीनींना विविध उदाहरणे देवून स्त्री व पुरुष समानतेवर संवाद साधला. यामध्ये कुटूंबातून होणारी मुलगा व मुलगी यांची जडण घडण, त्यातून निर्माण होणारी लिंगभाव जाणीव (Gender Sensatization) या विषयी चित्रांच्या माध्यमातून युवतींशी संवाद साधला. स्त्री व पुरुष यांच्यामधील शारिरीक व नैवर्गिक भेद तसेच मानव निर्मित भेद या संदर्भात विद्यार्थीनींना उदाहरणे देऊन त्यांच्याशी चर्चा केली. तसेच स्त्री व पुरुष समानता ही आपणच निर्माण करु शकतो या विषयी त्यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

College of Social Work, Chopda
IQAC
BMCS



**युवती सभा कार्यशाळेत विद्यार्थीनींना मार्गदर्शन करीत अतांना प्रा.भरत खंडागळे**

यानंतर प्रा.विशाल हौसे,(पॉलिटिकल विभाग, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा)यांनी विद्यार्थीनींना व्यक्तीमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी विद्यार्थीनींना आपले



**युवती सभा कार्यशाळेत विद्यार्थीनींना मार्गदर्शन करीत अतांना प्रा.विशाल हौसे**

BMC College of Social Work, Chopda IQAC

व्यक्तमत्व विकसित होण्यासाठी बहिर्गत व्यक्तिमत्व व अंतर्गत व्यक्तीमत्व विकसित केले पाहिजे. आपली उंची छोटी आहे, उंची लांब आहे. यामुळे खचून न जाता वाचन, चिंतन, मनन करुन आपली ज्ञानाची कक्षा उंचावणे जास्त महत्वाचे आहे. तसेच युवतींनी शरीराची काळजी घेत असतांना आपले करियरचा योग्य मार्गही निवडला पाहिजे. आपल्यातील सुप्त गुणांना वाव दिला पाहिजे. आपल्यामधील संभाषण कौशल्य, संवाद कौशल्य विकसीत केले पाहिजे. तसेच आई-वडीलांचा देखिल आदर केला पाहिजे. अशा प्रकारे त्यांनी सर्व बाजुंनी युवतींचे व्यक्तिमत्व विकसित होण्यासाठी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

यानंतर युवतींचे आरोग्य या विषयावर **डॉ.महेंद्र जैस्वाल, शालिनीदेवी नर्सिंग होम, चोपडा** यांनी मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी युवतींनी रोज सकाळी उठून व्यायाम केला पाहिजे. तसेच योगासनेही केली पाहिजेत. यामुळे शरीर सुदृढ होऊन भावी आयुष्यात त्याचा निश्चित फायदा होतो असे त्यांनी विद्यार्थीनींना समजावून सांगितले. तसेच डॉक्टारांनी गायनॉकॉलिस्ट या विषयासंदर्भात बोलतांना महिला व त्यांचे बाळंतपण या विषयीही विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानातून युवतींच्या आरोग्यसंदर्भातील प्रश्नांवरही सखोल चर्चा या दरम्यान युवतींशी केली. तसेच युवतींच्या आरोग्या करीता कोणत्या उपाय योजना कराव्यात या विषयीही त्यांनी विद्यार्थीनींशी चर्चा केली.




**युवती सभा कार्यशाळेत विद्यार्थीनींना मार्गदर्शन करीत असतांना डॉ.महेंद्र जैस्वाल**

यानंतर कार्यशाळेचा समारोप मा.ज्योत्सना जैस्वाल यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, डॉ.महेंद्र जैस्वाल, प्रा.कल्पना सोनवणे, सौ.रुपाली देसाई, प्रा.संबोधी देशपांडे हे उपस्थित होते. सदर कार्यशाळेत दोन विद्यार्थीनींनी आपले मनोगत व्यक्त केले.

आम्हाला या कार्यशाळेच्या माध्यमातून चर्चा करण्यासाठी खुले व्यासपीठ मिळाले. युवतींचे आरोग्य व स्त्री पुरुष समानता या व्याख्यानामधून नवीन चांगली माहिती मिळाले. या कार्यशाळेच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानाचा भविष्यकालीन जीवनात निश्चितच चांगला उपयोग होईल असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

College of Social Work, Chopda
IQAC




**युवती सभा कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी बोलत असतांना मा.ज्योत्सना जैस्वाल**




**युवती सभा कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थीनी/युवती**

कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाची विद्यार्थीनीं शहनाज तडवी हीने सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



**युवती सभा कार्यशाळेस उपस्थित युवती**



**युवतीसभा कार्यशाळेत भोजन करीत असतांना विद्यार्थीनी**

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda